# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४/०८/२०२०

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २९.६ ते ३२.७ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २०.६ ते २३.२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८५ ते ९५ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ५९ ते ९३ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी १.४ ते ६.७ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्हयात कमाल तापमान २९ ते ३१ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ९० टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ८० टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी १७ ते २७ कि.मी. दरम्यान राहील. आकाश पूर्णत: ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैऋत्येकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (२२/०७/२०२० ते २८/०७/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०४/०८/२०२० ते ०८/०८/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | दिनांक | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 0.0 | 1.5 | 7.6 | 31.5 | 36.8 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 324 | 212 | 98 | 30 | 18 |
| 32.5 | 32.7 | 31.6 | 29.6 | 31.9 | 30.8 | 30.0 | कमाल तापमान (अं.से.) | 29 | 29 | 30 | 30 | 31 |
| 23.2 | 23.1 | 22.7 | 20.6 | 22.0 | 22.2 | 22.5 | किमान तापमान (अं.से.) | 22 | 22 | 22 | 22 | 22 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 8 | 8 | 7 |
| 87 | 85 | 92 | 95 | 92 | 87 | 85 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 91 | 92 | 91 | 89 | 88 |
| 78 | 62 | 93 | 65 | 59 | 73 | 69 | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 81 | 82 | 85 | 79 | 71 |
| 3.2 | 3.7 | 3.9 | 1.5 | 1.4 | 3.9 | 6.7 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 27 | 25 | 20 | 17 | 17 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 253 | 251 | 229 | 245 | 261 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्हयात दिनांक ०४ ते ०६ ऑगस्ट २०२० रोजी बहुतांश ठिकाणी तर ०७ व ०८ ऑगस्ट २०२० रोजी काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.<br>**ईशारा :** जिल्हयातील भोर, वेल्हा, मुळशी, मावळ, खेड, आंबेगाव, जुन्नर, हवेली तालुक्यात दिनांक ०४ ते ०६ ऑगस्ट २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून जिल्हयातील पुरंदर, दौंड, शिरूर, बारामती, इंदापूर तालुक्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पडण्याऱ्या पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची |

| | | |
|---|---|---|
| | | फवारणी करावी तसेच पुढील तीन दिवस जोराचा पावसाची शक्यता असल्याने पिकांना वरखते देणे सध्या पुढे ढकलावे.<br>• पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी/ मुरविण्यासाठी उपाय योजना करावी. |
| भात | लागवड | भाताची राहिलेली लागण पूर्ण करावी व नवीन लागण केलेल्या भात खाचरात रोपे स्थिर होईपर्यंत पाण्याची पातळी १ ते २ सें.मी. ठेवावी. तसेच ज्या ठिकाणी लागवड केलेली रोपे प्राथमिक अवस्थेत आहेत तेथे २-३ सें.मी पाण्याची पातळी ठेवावी. भातरोपांची पुनर्लागवड झालेल्या ठिकाणी तणनियंत्रणासाठी ब्युटाक्लोर ५० ईसी किंवा बेंथिओकार्ब ५० ईसी १.५ किलो ५०० लि टर पाण्यात मिसळून लावणीनंतर १ आठवड्याच्या आत फवारावे. तणनाशक फवारणी पुर्वी खाचरातील संपुर्ण पाणी काढून टाकावे व दुस-या दिवशी पुन्हा पाणी भरावे. |
| सोयाबीन | पिक वाढीची अवस्था | पिकावर खोडमाशीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी. |
| ऊस | लागवड अवस्था | अडसाली ऊस लागवडीसाठी जमिनीची पूर्वमशागत करून रानबांधणी आखणी पूर्ण करावी. अडसाली ऊस लागण करताना को ८६०३२ व को एम ०२६५ या शिफारशीत जातींचा वापर करावा. बुरशीजन्य रोग व खवले किड याच्यापासून प्रतिबंधासाठी ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाण्यात डायमेथोएट ३० % प्रवाही २६५ मिली मिसळून १० मिनिटांसाठी बुडवून ठेऊन बेणे प्रक्रिया करावी. ॲसेटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक अनुक्रमे १० किलो आणि १.२५ किलो प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ऊसाच्या टिपऱ्या ३० मिनिट बुडवून नंतर लागण करावी त्यामुळे नत्रखतामध्ये ५० % ची तर स्फुरदखतामध्ये २५ % बचत होते. |
| तुर | पिक वाढीची अवस्था | अधिक उत्पादनासाठी पिक पेरणीनंतर ३०-४५ दिवस शेत तणविरहित ठेवावे जेणेकरून जमिनीतील ओलावा व अन्न्द्रव्यासाठी पिकांची परस्पराशी स्पर्धा होणार नाही. तसेच तुरीच्या अधिक उत्पादनासाठी लागवडीपासून ४५ दिवसांनी शेंडा खुडण्याची क्रिया करावी. |
| मुग उडीद | फुलोरा अवस्था | फुलकळी लागण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत गरजेनुसार कीड व रोग नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६% एस एल ६२५ मिली + पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्राम ५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टरी पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी. |
| मका | पिक वाढीची अवस्था | मका पिकात खोड कीड नियंत्रणासाठी फोरेट १०% दाणेदार किटकनाशक हेक्टरी १० किलो प्रमाणे मातीत मिसळावे. पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १०% पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. ४ मिली प्रति १० लिटर पा ण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी. |
| टोमॅटो | फळधारणा | टोमॅटोवरील फळपोखरणा-या अळीच्या व्यवस्थापनासाठी किडलेली फळे मातीत पुरुन टाकावीत तसेच डेल्टामेथ्रीन २.८ **%** ईसी ८ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ **%** ईसी २० मिली किंवा लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५% ईसी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| कागदी लिंबू | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ हवामानामुळे पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमीथोएट २० मिली १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावरांच्या गोठया भोवती पाणी साठणार नाही तसेच गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जनावरांना पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ व थंड पाणी द्यावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा , कृ.म.वि., पुणे
ठिकाण : कृ .म.वि., पुणे.
दि. : ३१.०७.२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**